271

क्र : बीएमआरडीए/एमटीजी/३०.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व] मुंबई- ४०० ०५१

दिनांक : १४ ऑक्टोबर, १९८३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, १९८३ रोजी झालेल्या तिसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यानी या बाबतीत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

[ ज. रा. संसारे ]
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी.

------------

No.BMRDA/MTG/30.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 14th October, 1983.

The minutes of the 30th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 3rd October, 1983 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

( J. R. SANSARE )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

ukd:

(273)

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तिसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ३ ऑक्टोबर, १९८३ (सोमवार)

वेळ : दुपारी १२.३० वाजता

सभास्थान : मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील माननीय उप मुख्य मंत्र्यांचा समिती-कक्ष

उपस्थित सदस्य :

१) श्री. रामराव वा. आदिक, – अध्यक्ष,
उप मुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री

२) श्री. चंद्रकांत त्रिपाठी, – सदस्य,
नगर विकास राज्यमंत्री

३) श्री. मनमोहनसिंग बेदी, – सदस्य,
मुंबईचे महापौर,

४) डॉ. सौरभ मजमुंदार, – सदस्य,
अध्यक्ष, स्थायी समिती,
मुंबई महानगरपालिका,

५) श्री. द. म. सुकथनकर, – सदस्य,
महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,

६) श्री. ह. रा. रंगनाथन्, – सदस्य,
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन,

७) श्री. स. शं. तिनईकर, – सदस्य,
शासनाचे सचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
महाराष्ट्र शासन,

८) श्री. ल. चं. गुप्ता, – सदस्य,
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको,

९) श्री. अ. ना. बटब्याल, – सदस्य-सचिव,
महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

....२/-

बाब क्र.१ : मागील (२९व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

वरील कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : मागील (२९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

प्रस्तुत कार्यवाही-अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र.3 ; वडाळा येथे एका विकास योजना आराखडा रस्त्याचे बांधकाम करण्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला कर्ज देण्यासाठी तरतूद -- अर्थसंकल्पीय सुधारणा

वरील विषयाची बाब टिप्पणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, संकल्पित ट्रक टर्मिनलला जोडणाऱ्या आणि विकास योजना आराखडा म्हणून यापूर्वीच अंतर्भाव झालेल्या उत्तर जोड रस्त्याच्या (नॉर्दन कनेक्टर रोड) बांधकामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला-- जिला कर्जरुपाने पुरेसा निधी मिळाल्याखेरीज सदर रस्त्याचे बांधकाम हाती घेता येत नाही म्हणून-- रु.५० लाखांपर्यंत कर्जाऊ रक्कम देण्याच्या प्रस्तावास हे प्राधिकरण मान्यता देत आहे.त्या संदर्भात महानगर आयुक्तांच्या संमतीने निश्चित होणारे नियम व शर्तींना धरुन त्याचप्रमाणे १९८३-८४ सालच्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात त्या-करिता योग्य ती तरतूद करण्याच्या शर्तीवर प्राधिकरण हा प्रस्ताव मंजूर करीत आहे."

बाब क्र.४ : सन १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कलम १3 अन्वये अधिसूचनेची मुदतवाढ

प्रस्तुत बाब-टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२3 :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १3 चे पोट-कलम (१) (आजमितीस सुधारित असल्याप्रमाणे) अन्वये आपल्या प्रदत्त अधिकारांचा व त्याला सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरुन महानगर प्राधिकरण या ठिकाणी जोडपत्र'आय्' मध्ये असल्याप्रमाणे प्रारुप अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांनी याच अधिनियमाच्या कलम ७(अ) अन्वये प्रदत्त अधिकारांचा वापर करुन सदर अधिसूचना योग्य रित्या अधिप्रमाणित केल्यानंतर ती महाराष्ट्र शासन राजपत्रांत प्रकाशित करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, जुन्या इमारतीच्या आंशिक बांधकामासंबंधी पारित केलेले आदेश राज्य शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका याना कळविण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.५ :</u> <u>तुर्भे येथील कृषी उत्पन्न बाजार पेठेसाठी कळवा-तुर्भे मालवाहू लोहमार्गाचे बांधकाम</u>

प्राधिकरणाने वरील बाब-टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.२२४ :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की,</u> दि.२३ मार्च, १९८१ रोजी आपल्या बैठकीत संमत केलेला ठराव क्र.१८८ निष्प्रभावित करुन त्याऐवजी कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे मार्गाच्या व रेल्वे कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामावर त्याचप्रमाणे उच्च दाबाच्या विद्युत्वाहिन्यांचे स्थलांतर, भूमी संपादन, आणि रस्त्यांची पुनः आखणी आदी बाबींवरील खर्चाचा निम्मा वाटा अनुदान-सहाय्य रुपाने सिडकोस भरणा करण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे. प्रस्तावित कार्यासाठी शासन आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देईल या शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरण वरील प्रस्तावास मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, १९८४-८५ वर्षात राज्य शासन रु.१ कोटी एवढया रकमेची प्रतिपूर्ती करील या शर्तीच्या अधीन राहून हे प्राधिकरण १९८३-८४ वर्षात सिडकोला रु.१ कोटी रकमेचा भरणा करील.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वरील अनुदान-सहाय्याबाबत तसेच मालवाहू लोहमार्गाचे शीघ्रतेने बांधकाम होणा-या दृष्टीने आवश्यक व उचित वाटणारी सर्व प्रकारची कृती करण्यास याद्वारे महानगर आयुक्ताना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम १९७५-- किमान अनुज्ञेय रकमेच्या मर्यादित वाढ

वरील बाब-टिप्पणीवर झालेल्या चर्चेनंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ५० (आजमितीस सुधारित असल्याप्रमाणे) व त्या सोबत या अधिनियमाचे कलम ११ चे उपकलम (२) याना अनुसरुन हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम १९७५ मध्ये या बाब टिप्पणीच्या जोडपत्रात दर्शविल्याप्रमाणे व प्रस्तावित केल्याप्रमाणे दुरुस्ती करीत आहे."

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधी) कर्मचा-यांची वर्गणी व प्राधिकरणाचे अंशदान (गतकालीन) ही दोन्ही प्रारंभी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वत: जमा करण्याबाबत

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात व्याजापोटी, कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यावर भूतलक्षी जमा करण्यास प्राधिकरणाने असमर्थता दर्शविली.

बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांसाठी निवास व्यवस्था

१) मुं.म.प्र.वि.प्रा.कर्मचारी (घर बांधणीसाठी कर्ज) विनियम, १९८१ आणि

२) मुं.म.प्र.वि.प्रा.(कर्मचा-यांचा अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम, १९७८-- यामध्ये दुरुस्ती

प्राधिकरणाने वरील बाब-टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२६ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ (आजमितीस सुधारित असल्याप्रमाणे) च्या कलम ५० खालील प्रदत्त शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण (१) मुं.म.प्र.वि.प्रा.कर्मचारी (घर बांधणीसाठी कर्ज) विनियम, १९८१ आणि (२) मुं.म.प्र.वि.प्रा.(कर्मचा-यांच्या

अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम, १९७८ यामध्ये, प्रस्तुत बाब टिप्पणीच्या अनुक्रमे जोडपत्रे 'अ' आणि 'ब' मध्ये सविस्तर विवेचन केल्याप्रमाणे दुरुस्ती करीत आहे."

बाब क्र.९ : अधीक्षकांची पदे निर्माण करणे

प्राधिकरणाने वरील विषयाच्या बाब-टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत विवेचन केल्याप्रमाणे रु.५००-२०-७००-२५-९०० या वेतनश्रेणीत अधीक्षकांची दोन पदे निर्माण करण्यास हे प्राधिकरण मंजुरी देत आहे."

बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील वाहन चालकांना अतिकालिक भत्ता

प्राधिकरणाने प्रस्तुत बाब-टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या आदेश क्र.जीसीएस-१३८०/सीआर्-३/एसईआर्-९, दिनांक २८ एप्रिल, १९८२ मध्ये समाविष्ट असलेल्या अतिकालिक भत्त्याच्या आदेशानुसार, परंतु मागील सहा महिन्यांच्या कालावधीत प्रत्येक महिन्यात वाहन चालकाने किमान दहा दिवस अतिकालिक सेवा केलेली असावी या कार्यपालनाचा आग्रह न धरता, या प्राधिकरणाच्या सेवेतील वाहन चालकांच्या अतिकालिक भत्त्याचे दिनांक १ एप्रिल १९८२ पासून विनियमन करण्यात यावे."

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हा अतिकालिक भत्ता वाहन चालकाने नऊ तास व पंचेचाळीस मिनिटांहून अधिक वेळ सेवा केलेली असल्यास देय असेल."

बाब क्र.११ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'इ' ब्लॉकमधील निवासी भू-खंडाची विक्री व अधिमूल्य निर्धारण

वरील बाब टिप्पणीवर प्राधिकरणाने विचारविमर्श केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२२९ :

"असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, दि.७ मार्च १९८१ रोजी स्थायी समितीच्या ठराव क्र.१९७ अन्वये पारित आदेश निष्प्रभावित करुन आता हे प्राधिकरण वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील निवासी भू-खंडाच्या विक्रीचा अधिमूल्य दर प्रती चटई क्षेत्र निर्देशांक वर्ग मिटरास रु.१८००/-असा निश्चित करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वांद्रे-कुर्ला समूहात सध्या उपलब्ध असलेल्या तीन निवासी भू-खंडापैकी (१) दोन भू-खंडाचे आयकर विभागास आणि (२) एका भू-खंडाचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला त्यांच्या कर्मचारी वर्गासाठी निवासस्थाने बांधण्याकरिता उपरोक्त अधिमूल्याच्या दराने नियत वाटप करण्यात यावे.

" त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,भू-खंडाचा नियत वाटपाचा देकार देण्याच्या संदर्भात पुढील कृती करण्यासाठी तसेच पट्टालेखात आवश्यक त्या ठिकाणी उचित बदल घडविण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.१२ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (बीयूटीपी) खाली 'बेस्ट'च्या ९ अधिकाऱ्यांना विदेशात प्रशिक्षण देण्यासंबंधी

प्राधिकरणाने प्रस्तुत बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र.230 :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहनाच्या नऊ अधिकाऱ्यांना (जोडपत्र १ मध्ये उल्लेख असल्याप्रमाणे) विदेशात प्रशिक्षण देण्यासंबंधी बेस्टच्या महाव्यवस्थापकांनी विचारार्थ पाठविलेल्या प्रस्तावास आणि उक्त प्रशिक्षण कार्यक्रमावर होणारा खर्च जागतिक बँक कर्ज करारनामा क्र.१३३५-आय एन (बीयुटीपी) मधील अनुसूची-१च्या प्रवर्ग-3 मधून भागविण्यास हे प्राधिकरण मंजुरी देत आहे.

" त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बेस्टच्या नऊ अधिकाऱ्यांना विदेशात प्रशिक्षण देण्यासंबंधीच्या बेस्टकृत सदर प्रस्तावाला या प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी/माननीय उपमुख्य मंत्र्यांनी प्राधिकरणाची संमती अपेक्षित धरुन पूर्व मंजुरी दिली.त्यांच्या या कृतीचे हे प्राधिकरण अनुसमर्थन करीत आहे."

पटल बाब : मुंबई महानगर प्रदेशासाठी दूरसंदेश दळणवळण नियोजन शाखा

चर्चेनंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२३१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारितील वाहतूक व दळणवळण विभागात एक दूरसंदेश दळणवळण शाखा स्थापन करण्यास हे प्राधिकरण तत्वतः मंजुरी देत आहे.

" त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत उल्लेख असलेल्या नियम व शर्तींबरहुकूम परंतु एका वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्त केला जाणारा सल्लागार आणि दुसरा पूर्णकालिक अधिकारी यांच्या नेमणुका एकाच वेळी करण्यात येतील आणि सदर प्रयोजनासाठी १९८३-८४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात आवश्यक ती वित्तीय तरतूद करण्यात येईल या शर्तींच्या अधीन राहून एक अंशकालिक सल्लागार आणि दुसरा मध्यम स्तरीय अधिकारी नेमण्याच्या प्रस्तावास हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

सभाध्यक्षांचे आभार मानून झाल्यानंतर बैठक समाप्त झाली.

---

ITEM NO.1

## MINUTES OF THE THIRTIETH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 3rd October, 1983 (Monday).

TIME : 12.30 P.M.

PLACE : The Dy. Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| 1) | Shri Ramrao W. Adik, Deputy Chief Minister and Minister for Urban Development. | - Chairman |
| 2) | Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development. | - Member |
| 3) | Shri Manmohansingh H. Bedi, Mayor of Bombay. | - Member |
| 4) | Dr. Saurabh R. Majmundar, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| 5) | Shri D.M. Sukthankar, Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| 6) | Shri N.R. Ranganathan, Secretary to the Government of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| 7) | Shri S.S. Tinaikar, Secretary to the Government of Maharashtra, Housing and Special Assistance Department. | - Member |
| 8) | Shri L.C. Gupta, Managing Director, C.I.D.C.O. | - Member |
| 9) | Shri A.N. Batabyal, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - Member-Secretary |

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (29th) Meeting.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last (29th) Meeting.

The action taken report was noted by the Authority.

Item No.3 : Provision .....

Item No. 3 : Provision of loans to Municipal Corporation of Greater Bombay for construction of Development Plan Road at Wadala - Revision of Budget for

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.222 :

"Resolved that the Authority approves the proposal for giving loan upto Rs.50/- lakhs by Bombay Metropolitan Region Development Authority to the Municipal Corporation of Greater Bombay for construction of the Northern Connector Road to the proposed Truck terminal which is already included as a Development Plan Road and which the Corporation is unable to execute unless requisite funds are loaned to them on terms and conditions to be agreed upon by the two organisations with the approval of the Metropolitan Commissioner and for including it in the Revised Estimates for the year 1983-84."

Item No. 4 : Extension of Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.223 :

"Resolved that the Authority in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 (as amended upto-date) and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of the draft Notification appended herewith as Annexure 'I'.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette, duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to inform State Government and the Bombay Municipal Corporation of the orders passed in the matter of part reconstruction of old buildings."

Item No.5 : Construction.....

Item No. 5 : Construction of Kalwa-Turbhe Goods Line for Agricultural Produce Market at Turbhe.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.224 :

"Resolved that in supersession of the orders passed under Authority's Resolution No.188, dated 23-3-1981, the Authority hereby approves the payment of a grant-in-aid to the City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. to cover 50% of the cost of construction of Kalwa-Turbhe Goods Line and the cost of construction of Railway Staff Quarters, shifting of H.T. Power Line, Land Acquisition, realignment of roads, etc., subject to Government making available the required funds.

"Resolved further that during 1983-84, the Authority will advance a sum of Rs.1/- crores to the City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. subject to Government reimburse the sum of Rs.1/- crores to the Authority in the year 1984-85.

"Resolved further that the Metropolitan Commissioner is hereby authorised to take all necessary and appropriate actions in respect of the above grant-in-aid as well as for expeditious construction of the Railway Siding."

Item No. 6 : B.M.R.D.A. (Reimbursement of Medical Expenses) Regulations, 1975 - Raising the limit of minimum admissible amount.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.225 :

"Resolved that in exercise of its powers under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 (as amended upto-date) read with sub-section (2) of Section 11 of the Act, the Authority hereby amends the Bombay Metropolitan Region Development Authority (Reimbursement of Medical Expenses) Regulations, 1975 as detailed in Annexure to the Item Note, as proposed."

Item No. 7 : BMRDA (Employees' Contributory Provident Fund) - Crediting employees' subscription and BMRDA's contribution initially by BMRDA for the past period.

The Authority expressed its inability to credit interest charges in this case with retrospective effect.

Item No. 8 : Housing accommodation for BMRDA employees' amendment to - (1) BMRDA Employees' (Housing Loans) Regulations, 1981; and (2) the BMRDA (Employees' Contributory Provident Fund) Regulations, 1978.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.226 :

"Resolved that in exercise of its powers under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 (as amended upto-date), the Authority hereby amends (1) the Bombay Metropolitan Region Development Authority Employees' (Housing Loans) Regulations, 1981 and (2) the Bombay Metropolitan Region Development Authority (Employees' Contributory Provident Fund) Regulations, 1978 as detailed in annexures 'A' and 'B' respectively to the Item Note."

Item No. 9 : Creation of posts of Superintendents.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.227 :

"Resolved that the Authority hereby agrees to create two posts of Superintendents in the pay scale of Rs.500-20-700-25-900 as proposed in the Item Note."

Item No.10 : Overtime allowance to Drivers of B.M.R.D.A.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.228 :

"Resolved that the grant of overtime allowance to Drivers in BMRDA should be regulated with effect

from .....

from 1.4.1982 in accordance with the orders contained in Government Resolution, Finance Department No.GCS-1380/CR-III/SER-9, dated 26.4.1982 without insisting on the performance of overtime work for at least 10 days per month on an average during the preceding six months.

"Resolved further that overtime allowance will be payable for duty in excess of 9 hours and 45 minutes."

Item No.11 : Disposal and determination of premium of residential plots in 'E' Block of Bandra-Kurla Complex.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.229 :

"Resolved that in supersession of the orders passed under Standing Committee's Resolution No.167, dated 7.3.1981, the Authority hereby determines the premium at the rate of Rs.1,800/- per F.S.I. square metre, for the residential plots in the 'E' Block of Bandra-Kurla Complex.

"Resolved further that out of the three available residential plots in the Bandra-Kurla Complex, (1) 2 plots be allotted to the Income Tax Department; and (2) 1 plot be allotted to the Reserve Bank of India, at the aforesaid rate of premium for construction of residential quarters of their staff.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to take further action for making the offers and effect suitable changes in the form of agreement to lease and lease deed wherever necessary."

Item No.12 : Bombay Urban Transport Project (BUTP) - Training in foreign countries to Nine Officers of Bombay Electric Supply and Transport Undertakings (BEST).

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.230 :

"Resolved that the Authority hereby approves the General Manager, BEST's proposal for training

abroad .....

abroad of 9 officers of BEST as mentioned in Annexure-1 and for incurring the expenditure on training from category 3 of schedule 1 of World Bank Loan Agreement No.1335-IN for Bombay Urban Transport Project.

"Resolved further that the action taken by the Chairman, Bombay Metropolitan Region Development Authority in approving the BEST's proposal for training abroad of 9 officers of BEST, in anticipation of approval of Authority is also hereby ratified."

The following item was then considered as Table Item, with the approval of the Chairman :

Table Item : Cell for Telecommunication Planning for the Bombay Metropolitan Region.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.231 :

"Resolved that the Authority hereby approves in principle to the setting of a Telecommunication Cell under the Transport and Communications Division, Bombay Metropolitan Region Development Authority.

"Resolved further that the Authority approves the proposal to appoint a part-time Adviser and another middle level officer on full time basis on the terms and conditions mentioned in the Item Note, provided the appointment of the Adviser is made for a period of one year and at the same time as that of the full time officer, and the funds required therefor be provided in the Budget Estimates for the year 1983-84."

The Meeting then concluded after a vote of thanks to the Chair.

\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$

ukd:131083.